**अभियोग पक्षाचा सा.क्र. ०२ चा शपथेवर पुरावा.**

मी याद्वारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करुन सांगते की,
माझे नांव – सोपान श्रीपती जाधव,
वय – ५२ वर्षे, धंदा - शेती,
रा. कडमुळी ता. चाकूर जि. लातूर.

**सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.एस. भराडीया यांच्या तर्फे सरतपास**

१. आरोपींना मी ओळखतो, ते वसंत रामराव जाधव यांच्या शेतात सालगडी असल्यामुळे त्यांना मी ओळखतो. वसंत जाधव हे माझे भावकीतील आहेत. घटना दि. १०.१०.२०१७ रोजी वसंत जाधव यांच्या शेतात संध्याकाळी ०६.३० वा. घडली होती. त्यावेळी मी माझे घरी होतो. मला घटनेबाबत पारावर चर्चा सुरु असातांना समजले होते. मला तेथे समजले होते की, वसंत जाधव यांच्या गडयाने पैशामुळे भांडण केले. भांडणामध्ये निर्मला यांनी वसंतराव यांची दोन तोळयाचे सोन्याची चैन हिसकावून घेतल्याचे मला समजले. राम यांनी वसंत रामराव जाधव यांच्या खिशातील रु.४५,०००/- घेतल्याचे मला समजले. त्यांनी वसंत जाधव यांना मारण्याची धमकी दिल्याचे मला समजले होते. रामने कु-हाड उचलून वसंत जाधव यांच्या अंगावर गेले होते असे मला समजले. निर्मला कांबळे यांनी अट्ॉसीटी करते अशी धमकी दिल्याचे मला समजले. पोलीसांनी माझा जबाब घेतला होता.

सरतपास समाप्त.

**उलट तपास आरोपीं तर्फे विधीज्ञ श्री. पी.व्ही. सोमवंशी यांच्या तर्फे**

२. मध्यान्हाची वेळ झाल्यामुळे उलटतपास तहकुब करण्यात

येतो.

(व्ही.एस. वाघमोडे)

दि.०८.०७.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, चाकूर.

**मध्यान्हानंतर उलट तपास आरोपीं तर्फे विधीज्ञ**
**श्री. पी.व्ही. सोमवंशी यांच्या तर्फे शपथेवर सुरु.**

३. माझे इ. १० वी पर्यंत शिक्षण झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की,वसंत जाधव हे भावकीतील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, ते माझे चुलत भाऊ आहेत. आरोपींची नावे मला ते माझयाकडे टॅक्टरवर कामाला असल्यामुळे माहीत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१७ मध्ये माझेकडे पिठाची गिरणी होती. हे म्हणणे खरे नाही की, वसंत जाधव व माझे घनिष्ठ संबंध होते. हे म्हणणे खरे आहे की, वसंत जाधव व मी आज आमच्या गावातून न्यायालयात एकत्र आलो आहोत. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१७ मध्ये निर्मला माझे पिठाच्या गिरणीमध्ये दळण दळण्याकरीता आले तेंव्हा माझे व त्यांचे वाद झाले होते. हे मला माहीत नाही की, निर्मला यांनी लातूर येथे पोलीस अधिक्षक कार्यालयात वसंत जाधव यांच्या विरुध्द तक्रारी अर्ज दाखल केला होता.

४. हे मला माहीत नाही की, त्या तक्रारीवरुन वसंत जाधव व इतर यांच्या विरुध्द भादवि. कलम ३४२,३२३,५०४,५०६ सह कलम ३४ व कलम ३(१) (एफ), ३(१)(५) अ.जा.ज.व जमाती कायदाअंतर्गत गुन्हा दाखल झाला होता. मला घटनेबाबत कोणी माहीती दिली त्या व्यक्तीचे नाव सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटना मी प्रत्यक्ष पाहीली

नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेबाबत मी ऐकीव माहीतीच्या आधारे सांगत आहे.

५. हे म्हणणे खरे नाही की, अॅट्रासीटी कायद्या अंतर्गत झालेल्या गुन्हयाला शह देण्यासाठी वसंत जाधव यांनी खोटी तक्रार दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वसंत जाधव हे माझे भावकीतील असल्यामुळे मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

६. मी पोलीसांना जबाब देतांना सांगितले होते की, मी घटनेबाबत पारावर चर्चा ऐकली होती. ते माझे जबाबात का नमुद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलीसांना जबाब देताना सागिते होते की, राम यांनी वसंत जाधव यांच्या खिशातुन रु. ४५,०००/- घेतले होते, ते माझे जबाबात का नमुद नाही याचे कारण मला सांगता येत नाही. पोलीसांनी जबाब चार दिवसानंतर घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

(व्ही.एस. वाघमोडे)

दि.०८.०७.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, चाकूर.